# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### मराठी विभाग

सकाळ

# वाचनसंस्कृती जोपासा : बुट्टे पाटील

**राजगुरुनगर, ता. २० :** वाचन हा माणसाच्या बौद्धिक विकासाचा पाया आहे, म्हणून विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासायला हवी. दिवाळी अंक ज्ञानाचा व माहितीचा प्रकाश घेऊन येत असल्याने ते खऱ्या अर्थाने साहित्याचा अक्षर ठेवा आहेत, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांना साधना हा दिवाळी अंक भेट देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.



**राजगुरुनगर (ता. खेड) : राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थ्यांना दिवाळी अंक भेट देताना मान्यवर.**

मराठी विभागाने आयोजित केलेल्या विविध साहित्यिक उपक्रमात विशेष प्रावीण्यप्राप्त पूनम ढेरंगे, प्राजक्ता मांजरे, संचिता मोरे, पूनम देसले, शिवम बंदावणे, ऋषिकेश गरुड, आरती विघ्ने, प्रशांत सिनलकर, श्रुती गारगोटे आदी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच या उपक्रमात सहभागी झालेल्या सुमारे १०० विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा व बालकुमार दिवाळी अंक भेट देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. तर आभार डॉ. बी. डी. अनुसे यांनी मानले.

Pune, District-Today
21/10/2019 Page No. 7

लोकमत

# दिवाळी अंक म्हणजे साहित्याचा अक्षरठेवा

## ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात दिवाळी अंक भेट कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**दावडी :** दिवाळी अंक हे दरवर्षी वाचकांना ज्ञानाचा प्रकाश घेऊन येत असतात. खऱ्या अर्थाने साहित्याचा अक्षरठेवा असतात, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित विद्यार्थ्यांना दिवाळी अंक भेट कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर होते. प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. एम. एल. मुळूक, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. एस. एस. आल्हाट आदी उपस्थित होते.

मराठी विभागाने आयोजिलेल्या विविध साहित्यिक उपक्रमात विशेष प्रावीण्यप्राप्त पूनम ढेरंगे, प्राजक्ता मांजरे, संचिता मोरे, पूनम देसले, शिवम बंदावणे, हृषीकेश गरुड, आरती बिष्णे, प्रशांत सिनलकर, श्रुती गारगोटे आदी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. उपक्रमात सहभागी सुमारे १०० विद्यार्थ्यांना दिवाळी अंक भेट देण्यात आला. प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, तसेच संचिता मोरे, हृषीकेश गरुड या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. डॉ. बी. डी. अनुसे यांनी आभार मानले.

- बुट्टे-पाटील म्हणाले, 'वाचन माणसाच्या बौद्धिक विकासाचा पाया असून विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासायला हवी. विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहताना पुस्तकांशी मैत्री करावी. ध्येय साध्य होईपर्यंत अविरत मेहनत घ्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख